Vol 4 Issue 7 Jan 2015 ISSN No :2231-5063

International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

## Welcome to GRT

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 3.4052(UIF)
Volume-4 | Issue-7 | Jan-2015
Available online at www.aygrt.isrj.org

GRT

# महानुभव संप्रदायाची वाङ्मयीन पार्श्वभूमी

*सुधाकर जाधव*

सहाय्यक प्राध्यापक , लाल बहाद्दूर शास्त्री महाविदयालय परतूर, ता.परतूर, जि.जालना (महाराष्ट्र)

***सारांश*** :'भारतीय संस्कृती हा अनेक पदरी गोफ आहे. भिन्न – भिन्न वंशाच्या, विविध धर्माच्या, वेगवेगळया संस्कृतीच्या लोकांनी तो गुंफलेला आहे. पण त्यातला आर्यांचा व वैदिकांचा जो पदर आहे तोच तेवढा महत्वाचा, मानाचा आहे भारतीय संस्कृतीच्या स्वरुप निर्णयाबाबत त्याचाच विचार तेवढा आवश्यक आहे असा आभास निर्माण करण्यात आला आहे.''[1] महाराष्ट्रीय संस्क?तीचा बराच अंश हा मूळचा आर्येतर, अवैदिक आहे. संस्कृतीची भाषा आणि वाङ्मयातूनच त्या-त्या संस्कृतीचे वहन होत असते. वैदिक, आर्यांच्या संस्कृतीचे गुणगान गाणारे वाङ्मय निर्माण झाले. संस्कृत ही आर्यांची भाषा आर्यपूर्व भारतात संस्कृत भाषा प्रचलित नव्हती.

## *प्रस्तावना :*

''आर्यांच्या पूर्वीच्या देशात ऑस्ट्रिक भाषा बोलणारे प्रोटोऑस्ट्रोलॉईट वंशाचे लोक व द्राविडी भाषा बोलणारे मेडिटरेनियन वंशाचे लोक यांची वस्ती होती. या दोघांच्या भाषांचा जीत संकर झालेला आहे. अशी भाषा आर्थपूर्व काळात भारतात प्रचलित असावी''[2] असा अ.ना. देडपांडे यांचा कयास आहे. परंतु आर्यांचा भारतात झालेल्या प्रवेशानंतर इथल्या एतद्देशीय सुसंस्कृत सैधवांशी त्यांचा संघर्ष झाला. या संघर्षातून पुढे आर्य व आर्येतर या भिन्न संस्कृतीच्या लोकांचा एकच वास घडला त्यातूनच आचार–विचारांबरोबरच भाषाही संक्रमित झाली. भारतात भाषांचे दोन प्रमुख प्रवाह होते. एक आर्यांच्या संस्कृतीचा आणि दुसरा ऑस्ट्रिक व द्रविड मिळून झालेल्या बहुजन समाजाच्या पाकृत देशी भाषेचा भारतातील प्रचलित विविध भाषांतील किती तरी शब्द या प्राकृत देशी प्रवाहातून आलेले ओहत. असे असूनही संस्कृत ही मूळ शुध्द भाषा, मराठी – हिंदी – बंगाली वगैरे सगळया उत्तर भारतीय भाषा म्हणजे तिची अपभ्रष्ट रुपेः या निराधार, भ्रामक समजतील शास्त्राच्या पदवीप्रत पोहोचविण्यात आले आहे ! आर्येत भाषांच्या वास्तविक प्रभावाची जाणून बुजून उपमर्द करणारी इतिहास दुष्ट आणि विकृत भाषा दृष्टी या भाषाशालाने पध्दतशीर प्रयत्नपूर्वक जोपासलेली आहे. भारतीय भाषांच्या निर्मितीत आणि घडणीत द्रविड आणि ऑस्ट्रिक भाषाचे जे ऋण आहे त्याचा विस्मरणाच्या पार्श्वभूमीवर काही प्रमुख, ठळक भारतीय भाषांचे सर्वकष्व संस्कृतमूलत्व प्रस्थापित करण्यात आलेले आहे. संस्कृतचा जयस्तंभ हा अशा रीतीने लोक–द्रोहाच्या भूमीत गाडलेला आहे. लोक दुःख निवारण्याची खरी जिवंत तळमळ लागलेल्या गौतम बुध्द बसव, श्री. चक्रधर ज्ञानेश्वरादी लोकनेत्यांनी, संत महंतांनी देववाणीचा दिमाख मिरणा–या संस्कृतला, नाकारुन लोकभाषांचा आग्रहपूर्वक व अभिमानपूर्वक आश्रय घेतला. यात जे सांस्कृतिक संघर्षाचे, दोन भिन्न संस्कृतींच्या विरोधाचे रहस्य आहे. ते आमच्या मनोभूमीत आम्ही रुजू दिले नाही. थोडेसे रुजले तरी ते पूर्ण विकसित अवस्थेत जावून पोहचण्याइतके आम्ही वाढू दिले नाही ही वस्तुस्थिती आहे.

भाषा, साहित्य आणि संस्कृती या परस्पर संबंधित गोष्टी असतात. भाषेतूनच साहित्यानिर्मिती होत असते आणि साहित्यातून त्या भाषिक समूहाची संस्कृती दिसून येत येत असते. त्यामुळे भाषेप्रमाणेच संस्कृत साहित्यातही उपरोक्त निर्देशित दोन भिन्न सांस्कृतिक परंपरांचा प्रभाव पडलेला दिसतो साहित्यात, साहित्याशास्त्रीय विचारात एक दृष्टी संस्कृत साहित्यशास्त्रांची आहे. संस्कृत साहित्यशास्त्र हे भारतातील समग्र साहित्य शास्त्रीय संप्रदायाचे पूर्ण प्रतिनिधीत्व करते या खोटयाच कल्पनेला कुरवाळुन त्याचे ''भारतीय साहित्यशास्त्र'' असे नामकरण करण्यात आले आहे. या संस्कृत साहित्याशास्त्राची पुढे बेजबाबदार समाजदृष्ट विश्रांतीवादात परिणती झालेली आहे. 8 वे शतक ते 11 वे शतक हा जो भारताच्या अधःपाताचा, पराभवाचा, दौर्बल्याचा काळ, त्याच काळात नेमके हे साहित्य शास्त्र पुष्ट आणि समृध्द झाले आहे. परंतु या साहित्यशास्त्राने कोणती अभिरुची जोपासलेली होती याचे उत्तम उदाहरण अ.ना.देशपांडे यांनी दिलेले आहे. ''मुखावर स्मित विकसित् झालेले आहे.दृष्टीने वक्रतेवर प्रभुत्व मिळविलेले आहे गतीमध्ये विलास उफाळत आहे. मनाने स्थैर्याचा त्याग केला आहे. वक्षः स्थलावर स्तन मुकूलित होताना दिसत आहेत व जघन

अवयव पुष्टतेमुळे रतियोग्य झाले आहेत. अहाहा ! चंद्रमुखीच्या शरीरात यौवनाची केवळ आनंदक्रीडा चालेलेली आहे''[3] म्हणजे संस्कृत साहित्यशास्त्राने शृंगार भावालाच अभिरुचीचे स्थान दिलेले होते. अगदी धार्मिक ग्रंथांच्या रचनेतून देखील हा शृंगार ओतप्रोत भरलेला दिसून येतो. त्यामुळे ते समाजदृष्टय बनलेले असून तर्कशास्त्रीय आणि मानशास्त्रीय अपेक्षांना दुर्लक्षिणारे होते. म्हणून जो पर्यंत विभादिक उपस्थित असतील तो पर्यंतच चर्वणा असते. विभादिक गेले की, त्या बरोबर चर्वणादेखील जातेत्र अशी विधानं या साहित्यशास्त्रात केली गेली. त्याचप्रमाणे एखादया कवीची काव्यकृती वाचल्यानंतर प्रत्येक रसिकाला त्यांची रसानुभूती वेगवेगळी येवु शकते. असे असतानाही या संस्कृत साहित्यशास्त्राने रसिकाला येणारी रसप्रतीती ही कवीगत प्रतीतीच असते असे म्हटले. एकूणच काव्य प्रयोजनात सामाजिक वास्तवाचा वेध घेणे हे प्रयोजनमूलक घटक या साहित्यशास्त्राने नाकरलेले दिसते. त्यामुळे संस्कृत साहित्य हे अभिजनांच्या अभिजाततेच अडकलेले होते.

भारतीय साहित्य क्षेत्रात दुसरी एक परंपरा दिसून येते. ही दुसरी परंपरा जीवनोन्मुख स्वरुपाची आहे. या परंपरेची मूळं आर्यपूर्व सिंधू संस्कृतीत सापडतात. आर्यपूर्व सिंधू संस्कृतीतल्या एतद्देशीय लोकांनी निव्वळ कलेकरिता कला निर्मिलेली दिसत नाही. त्यांच्या कलानिर्मितीला सामाजिक आयाम आहेत. आर्योत्तर प्राचीन भारतातील कला निर्मितीचे प्रमुख श्रेय 'वैदिक संस्कृतीचा विकास अभ्यासणा–या संशोधकांनी शूद्रांना दिले आहे. त्यांनी असे मत मांडले की, भारताच्या आर्थिक जीवनाचा पायाभूत घटक आणि वस्तुरुप संस्कृतीचा खरा निर्माता शूद्र आहे. तरी ही आर्योत्तर भारतातील सामाजिक स्तरातले त्याचे स्थान सर्वात निकृष्ट, शिवाय त्याच्या डोक्यावर ऋणाचा भार सर्वात अधिक मग असा हा श्रमजीवी शूद्र केवळ कलावादाच्या नादी लागून जीवनमतूल्यांविषयी बेजबाबदार बनून कलानिर्मिती करील हे शक्यच नाही. भोगवादासाठी, विलासासाठी चैनीच्या वस्तू पुरवण्याकरीता हा शूद्र आपल्या कलानिर्मितीचा उपयोग करील हेही शक्य नाही. ब्राम्हण क्षत्रिय आणि वैश्य या तीन वर्णाकडे नसलेल्या अनेक उदयोगांमधून तो आपले कर्तृत्व साधत होता. शेती व्यवसाय, पशुपालन, धातूकाम, विणकाम, चर्मकाम, माती घडवण्याचे, कुंभारकाम, सुतारकी, लोकाहरकी इतयादी उदयोग धंदयांतून तो आपली कला आजमावत होता. त्यामुळे असे म्हणता येईल की, शूद्रांची कला ही जीवनसन्मुख होती. वाङमय निर्मितीच्या क्षेत्रातही प्राचीन भारतात शूद्रांचा खूप मोठा वाटा आहे.

'पुराण हे भारतीयांच्या जीवनावर परिणाम करणारे विशेष प्रभावशाली वाङमय. त्याचे रचनाकार मुख्यतः शूद्रच होते. असे वैदिक संस्कृतीचा विकास लिहिण्या–यांनी सांगितलेले आहे''[4] त्यामुळे या पुराणांमध्ये शूद्रांचे जीवन काही अंशी उमटलेले दिसते सूत, माधव, बंदी या शूद्र जमातींनी मूळात पुराणांची रचना आणि पुराणकथांचा पिढयानपिढया संग्रह करुन अभ्यास व वाढ केली आहे. देशी, प्रांतीय भाषा, शौरसेनी, मागधी, पाली इत्यादी प्राकृत भाषांतून व द्रविड भाषांतून जन्मल्या प्राकृत भाषांतील साहित्य पुराणांच्या रुपात प्रथम अस्तित्वात होते. नंतर ते संस्कृतात रुपांतरित झाले व काही नष्ट झाले किंवा केले गेले. आजचे पुराण आणि पूर्वीचे पुराण यात खूप मोठा फरक आहे. ज्या पुराणांची निर्मिती शूद्रांनी केलेली आहे. तेच पुराण शूद्रांना अस्पृश्यांच्या खाईत कसे लोटू शकते ? परंतु इ.सत्र 800 ते इ.स 1200 या कालखंडात या पुराणांवर ब्राम्हणी संस्कार झाले. मूळ, पुराणलेखकांना बाजूला सारुन स्वतःच्या नावावर संस्कृत भाषेत ही पुराणं लिहिली गेली. प्राकृतातून, लोकभाषेतून शूद्रांचे सामान्य जनतेचे काव्यानाटकादी वाङमय निर्माण झााले होते. परंतू ते संस्कृतपंडितांच्या कृतींनी निस्तेज होवून लुप्त पावले. या संदर्भात आपले मत नोंदवताना अ.ना. देशपांडे म्हणतात. ''शूद्र हे अर्थोत्पादक व्यवसायात राबणारे व रमणारे, उत्पादक, श्रमांपासून कटाक्षाने अलिप्त राहणा–या व वर्णश्रेष्ठत्वाचा तोरा मिरविणा–या उच्चवर्णीयांनी, 'सांसरिक जीवनाच्या विधायक व प्रवृत्तीमार्गी भावनांना व मूल्यांना प्राधान्य देणारे असे जे शूद्रांचे वाङमय त्यास मागे टाकले व शूद्र जमातींची सामाजिक प्रतिष्ठा वाढणार नाही असे एकंदर धोरण त्यांनी यशस्वी रीतीने अंमलात आणले. ब्राम्हण म्हणजे उच्च वर्ण आणि संस्कृत यांची युती ही अशा रीतीने शूद्राद्रोही, जनताद्रोही शक्ती ठरली''5 यातून हे सिध्द होते की, आर्येतर वाङमयाचा दुसरा प्रवाह संस्कृत पंडितांनी खंडित केलेला होता. प्राकृत आणि लोकभाषेतील ग्रंथरचना संस्कृतात रुपांतरित करुन बहुजन वर्गाच्या भाषा साहित्य आणि संस्कृतीचा उपमर्द केला होता. त्याचा कालखंडदेखील इ. स. 800 ते 1200 पर्यंतचा आहे. त्यानंतर शंभर वर्षानी जन्माला आलेल्या श्री. चक्रधर स्वामींनी आणि महानुभाव साहित्यकारांनी ही दुसरी परंपरा पुनरुज्जीवित केली.

महानुभवीय वाङमय निर्माण होण्याच्या अगोदर शंभर वर्षाचा इतिहास पाहिला तर असे दिसून येते की, वैदिक धर्म व्यवस्थेने ज्ञान संपादन करण्याचा अधिकार केवळ ब्राम्हणांना दिलेला होता. धर्मशास्त्राा प्रमाणे ब्राम्हणेत्तर बहुजनवर्गाला धार्मिक ज्ञान घेण्याचा अधिकार नव्हता इतकेच नाहीतर शूद्रातिशूद्रांनी धार्मिक ग्रंथाचं श्रवणदेखील करु नये. तसे केलयास त्यांच्या कानात तप्त शिसे ओतण्याची पाशवी शिक्षा देण्याचा कायदा होता त्यामुळे ब्राम्हणेतर समाज ज्ञानापासून वंचित राहिलेला होतात्र शिवाय ग्रंथरचनेसाठी केवळ 'संस्कृत' या देवभाषेचाच उपयोग करावा हा त्यांचा नियम होता. संस्कृत भाषा मोठी कठीण असल्याने सर्वसामान्य माणसांना कळणे अवघड होते. त्यामुळे धर्मशास्त्र नीतीशास्त्राचे ज्ञान सर्वसामान्य जनतेन मिळत नव्हते. संबंध वैदिक ग्रंथ संपदा संस्कृत मध्ये असल्याने स्वतः सर्वसामान्य लोकांना ते वाचता येत नव्हते, तर लिहिणे ही तर दूरचीच गोष्ट होती. महानुभाव संप्रदायाचे प्रवर्तक श्री. चक्धर स्वामीहे स्वतः संस्कृतपंडित होते. संस्कृत बरोबरच त्यांना इतर ही अनेक भाषा अवगत होत्या. परंतु तरी ही त्यांनी सर्वसामान्यांना पटतील असे लोकभाषेतून म्हणजेच मराठीतून आपले विचार सांगण्यास सुरुवात केली. कारण मराठी ही सर्वसामान्यांची बोलीभाषा होती. आणि या बोलीभाषेतूनच जर हे विचार सांगितले तर ते लवकर, सर्वसामान्य लोकांना समजतील हा श्री चक्धरांचा त्या मागचा हेतू होता. या मध्ययुगीन काळात संस्कृतला ज्ञानवंतांची व ज्ञानप्राप्तीची भाषा समजली जायची. ज्ञानभाषा व लोकभाषा या वेगवेगळया असल्याने बहुजन समाजाला ज्ञानप्राप्तीचा मार्ग मोकळा नव्हता. मराठी भाषेच्या अभ्यासकांनी ज्ञानेश्वराला मराठीचा उदगाता म्हटलेले आहे. कारण, त्यांनी संस्कृत 'गीता' प्राकृत मराठी भाषेतून 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथाव्दारा सांगितलेली आहे. मात्र लोक भाषेला ज्ञानभाषेचे रुप देण्याचे कार्य त्यांच्या पूर्वीच श्रीचक्धरांनी व त्यांच्या महानुभाव पंथातील पंडित, ग्रंथलेखकांनी केलेले आहे. मुळात मध्ययुगीन काळातील साहित्य हे धर्मप्रवण होते. साहित्य आणि धर्म या परस्परावलंबी गोष्टी होत्या. महानुभाव संप्रदायातील वाङमयदेखील धर्मप्रवणच होते. मात्र पारलौकिक ज्ञानाबरोबरच इहलोकीच्या

भौतिक ज्ञानाच्या क्षेत्रातही या वाङ्‌मयाने प्रवेश केलेला दिसतो. ही मराठी साहित्यातली एक मोठी घटना होती. शिवाय 'रामायण' 'महाभारत' आदी महाकाव्यांची परंपरा असा–या या वाङ्‌मय क्षेत्रात गद्य वाङ्‌मयाची रचना करुन नवा पायंडा पाडण्याचे काम महानुभाव साहित्याने केलेले आहे. कारण तत्कालीन ग्रंथरचना ही केवळ काव्यांतूनच होते असे साहित्यात फक्त काव्य हाच एकमेव प्रकार असतांना ग़द्यनिर्मीती करुन मराठी साहित्यात गद्यलेखनाचा प्रारंभ केला.

*संदर्भ :*

1. देशपांडे अ.ना., प्राचीन वाङ्‌मयाचा इतिहास, खंड 1 ला, पुर्वार्ध, व्हीनस प्रकाशन पुणे, प्र.आ. 1966, पृ.क. 35.
2. तुळतुळे श. गो., महानुभाव पंथ आणि त्यांचे वाङ्‌मय, व्हीनस प्रकाशन, पुणे प्र.आ.1976, पृ.क. 1
3. नशिराबादकर ल.रा, प्राचीन मराठी वाङ्‌मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्र.आ. 2003, पृ.क. 14
4. कपाटे श्री. तू, महानुभाव संप्रदायाचे चिंतन, उनि, प्रस्तावनेतून उद्धत

Publish Research Article
International Level Multidisciplinary Research Journal
For All Subjects

Dear Sir/Mam,
We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org